Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# रंगनाथ पठारें यांच्या कादंबरीच्या शीर्षकांची मौलिकता

**डॉ. रानमाळ पी. जी.**
मराठी विभाग,
अंकुशराव टोपे महाविद्यालय,
जालना.

## प्रस्तावना:

रंगनाथ पठारेंच्या कादंबऱ्यांची शीर्षके ही वेधक असून आशयाची अर्थपूर्णता व्यक्त करणारी आहेत. कादंबरीचे शीर्षक हे आशयाशी संवादी रुप धारण करता दिसते. पारंपरिक कादंबरीसारखी ती नाहीत. वाचकाला चिंतन करायला लावणारी, विचारशीलता असणारी अशी आहेत. ही शीर्षके रंगनाथ पठारेंच्या कादंबरीत आशयामध्ये कुठेतरी ओघाओघात येऊन गेलेली आहेत. त्यामुळे आशयाशी नाते ती व्यक्त करतात. हे त्यांच्या शीर्षकातील वेगळेपण मराठी कादंबरीला योगदान देणारे असेच आहे. लेखक रंगनाथ पठारेंच्या कादंबऱ्यांच्या शीर्षकांचे आशयाशी घट्ट नाते आहे. त्यांच्या पहिल्याच कादंबरीचे शीर्षक 'दिवे गेलेले दिवस' हे आणीबाणीच्या काळात सर्वसामान्य माणसाची कोंडी कशी झाली याचे दर्शन घडवते. आयुष्य अंधारमय आहे पण ते कायमस्वरुपी नाही असे दिवे गेलेले दिवस पण प्रकाशमय दिवस येईलच असे आशावादी जीवन व्यक्त करणारे आहे. कादंबरीमध्ये समाजवादी म्हाताऱ्याच्या कृतीपर भाषणामुळे निवेदक जे भाष्य करतात ते शीर्षकाची अर्थपूर्णता व्यक्त करणारे आहे.

## कादंबरीच्या शीर्षकांची मौलिकता:

'रथ' मध्येही पारनेरकरांच्या प्रश्नाला रावसाहेब निकम उत्तर देताना ग्रामीण साहित्य चळवळ हा एक 'रथ' आहे, तो चालवणे एकट्याचे काम नाही आणि तो किती महत्त्वाचा आहे, हे सांगतात. यातून पठारेंच्या कादंबरीच्या शीर्षकातून कादंबरीच्या आशयाचा गाभा व्यक्त होतो, याचा प्रत्यय येतो.

'चक्रव्यूह' हे शीर्षक एक वेगळेपणा व्यक्त करणारे आहे. गोपीचंदच्या मनात माणसाच्या आयुष्यासंबंधी अस्वस्थता आहे. त्याचा गुंता म्हणजे हा चक्रव्यूह आहे. कादंबरीच्या आशयात अनेक

ठिकाणी हे शीर्षक प्रतीत होते. अशा गोपीचंदच्या मनातील चक्रव्यूह या कादंबरीत अनेक ठिकाणी व्यक्त होतो. 'हारण' हे कादंबरीचे शीर्षक दोन अर्थ व्यक्त करते. ते द्वयर्थी आहे. हारण म्हणजे हरिण जी अतिशय सुंदर असते. हा एक अर्थ व दुसरा अर्थ हारण म्हणजे अपहरण, पळूण नेणे असा होय. हे दोन्ही अर्थ या कादंबरीतील नायिका हारणच्या रुपातून लेखकाने संपूर्ण कादंबरीच्या आशयात अधोरेखित केले आहे. या आशयात स्त्रीचे दु:खमय जीवन, पुरुषीसत्तेचे सावज म्हणून तिचे चित्रण केले आहे. कादंबरीच्या आशयाशी एकजीव असलेले हे शीर्षक होय.

'टोकदार सावलीचे वर्तमान' हे कादंबरीचे शीर्षक एक वेगळेपणा घेऊन आले आहे. एखाद्या कवितेतील शब्दात जी लय असते. ती लय त्या शीर्षकातून प्रतीत होते. याशिवाय प्रा. गजानन भांगरेंच्या निवेदनातून या शीर्षकाचा आशय संपूर्ण कादंबरीत व्यक्त होताना दिसतो. गजानन भांगरे हा आईच्या आयुष्यासंबंधी, तीन मुलीच्या जीवनकहाणीतून त्यांच्या मनावर भूतकालीन आयुष्याचा झालेला परिणाम लेखकाने मार्मिकतेने रेखाटला आहे. असा शीर्षकाचा आशय कादंबरीतून प्रा. भांगरेंच्या जीवनातून प्रतीत होताना दिसतो. थोडक्यात कादंबरीच्या आशयातून हे शीर्षक या कादंबरीला लाभले आहे.

'ताम्रपट' हे शीर्षकही कादंबरीच्या आशयाची अर्थपूर्णता व्यक्त करणारे आहे. ज्या ज्या व्यक्तींनी स्वातंत्र्यासाठी योगदान दिले होते. अशा स्वातंत्र्यसैनिकांच्या गौरवार्थ इंदिरा गांधींनी 'ताम्रपट' दिले होते. मानधनही दिले होते. दादासाहेबांच्या बंगल्याचे नाव 'ताम्रपट' असेच आहे आणि नाना सिरुरांना आयुष्याच्या शेवटी वाटणारा 'मानव्यावरील करुणेचा ताम्रपट' चा आलेला प्रत्यय या तीन ताम्रपटाने कादंबरीच्या आशयाचा गाभा आविष्कृत होताना लेखकाने रेखाटला आहे. त्यामुळे शीर्षकाला अर्थपूर्णता लाभलेली आहे.

'दु:खाचे श्वापद' हे कादंबरीचे शीर्षक एक वेगळेपणा घेऊन आलेले आहे. श्वापद म्हणजे हिंस्त्र पशू, वाघ, सिंह जे शिकार करतात अशांना संबोधले जाते. पण हे मानवी पातळीवरील श्वापद होय. पुरुष हाच स्त्रीचे शोषण करतो. अन्याय, अत्याचार करतो, बळी घेतो. हिंस्त्र पशुसमान वर्तन करतो असा आशय व्यक्त करणारे हे शीर्षक आशयघन आहे. लेखकाने प्रा. वालझाडेंच्या निवेदनातून अनेक ठिकाणी कादंबरीच्या आशयात या शीर्षकाच्या अर्थाचा प्रत्यय घडवला आहे. अशाप्रकारे

कादंबरीच्या आशयातूनच शीर्षकाचा अर्थ ही लेखकाने पात्रांच्या मनोगतातून व्यक्त केला आहे. आशयाशी अनुकूल अशी त्यांच्या कादंबरींची शीर्षके आहेत.

'नामुष्कीचे स्वगत' हे कादंबरीचे शीर्षक माणसांचे जगणे, वर्तमान स्थितीतील हतबलता, असहायता, त्याचे तुटलेपण, व्यक्त करणारे आहे. लिहिणे ही लेखकाची कृती 'नामुष्कीचाच' प्रत्यय देणारी आहे. प्रतिसादच मिळत नसेल तर पदोपदी नामुष्की येते. स्वगताशिवाय पर्याय उरत नाही. या अर्थाने हे शीर्षक विचारशील बनवणारे, बौद्धिक क्षमतेचा कस लावणारे असे आहे. पठारेंच्या कादंबरीची शीर्षके ही वाचकाला विचार करायला लावणारी अशी आहेत.

**निष्कर्ष:**

थोडक्यात, रंगनाथ पठारेंच्या कादंबरीची शीर्षके ही कादंबरीच्या आशयातून आलेली व अर्थपूर्णता व्यक्त करणारी आहेत. ती आशयातून आलेली असल्याने लेखकाच्या जीवनदृष्टीचा प्रत्ययही शीर्षकांतून व्यक्त होतो. वैचारिक चिंतनशीलता, लयता असा प्रत्ययही शीर्षकातून येतो. 'हारण', 'टोकदार सावलीचे वर्तमान', 'दु:खाचे श्वापद', ही शीर्षके स्त्रीविषयक सूचन करणारी आहेत. 'चक्रव्यूह', 'नामुष्कीचे स्वगत', 'दिवे गेलेले दिवस' ही माणसाच्या जीवनाचा मनाच्या अस्वस्थतेचा, कोंडीचा प्रत्यय देणारी आहेत. 'ताम्रपट' हे ऐतिहासिक वस्तूंचे सूचन करणारे आहेच पण त्याबरोबर मानवी जीवनपटही अधोरेखित करणारे आहे. अशाप्रकारे रंगनाथ पठारेंच्या कादंबरीच्या शीर्षकांमध्ये वेगळेपणाचा प्रत्यय येतो. शीर्षकातील वेगळेपण मराठी कादंबरीला योगदान देणारे असेच आहे.

**संदर्भ:**


- पठारे रंगनाथ : 'आस्थेचे प्रश्न', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ. २०००
- पठारे रंगनाथ : 'चक्रव्यूह', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, द्वि.आ. २००१
- पठारे रंगनाथ : 'टोकदार सावलीचे वर्तमान', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, द्वि.आ. १९९८
- पठारे रंगनाथ : 'ताम्रपट', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, द्वि.आ. २०००
- पठारे रंगनाथ : 'दिवे गेलेले दिवस', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, द्वि.आ. २०००
- पठारे रंगनाथ : 'दु:खाचे श्वापद', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, ति.आ.१९९९

- पठारे रंगनाथ : ‘नामुष्कीचे स्वगत’, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ. १९९९
- पठारे रंगनाथ : ‘रथ’, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, द्वि.आ. २००४
- पठारे रंगनाथ : ‘सत्वाची भाषा’, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ. १९९७
- पठारे रंगनाथ : ‘हारण’, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९९०
- बागले प्रभाकर : ‘निमित्ताच्या निमित्ताने’, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.१९९८